# गाथा

सौ. वैशाली कुलकर्णी
कु. अमृता ढगे

साहित्य प्रतिष्ठान






ॐ काराचेच व्यक्त रुप
म्हणजे गणपती. कोणत्याही कार्याचा
शुभारंभ अर्थात श्रीगणेशा
हा श्रीगणेशाला वंदन करुन,
त्याला शरण जाउनच केला जातो,
ज्यामुळे ते कार्य सिध्दिस जाते.
वेदकाळापासुन चालत आलेली
ही परंपरा आजही
निःसीम श्रध्देने पाळली जाते,
कारण तो विघ्नहर्ता आहे.
ब्रह्मणस्पती आहे, विद्येचा पती आहे.
वाचेचा अधिष्ठाता आहे.

गणानां त्वां गणपतिं हवामहे
कविं कविनामुपमश्रवस्तमम्।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः
श्रुण्वन्तिभिः सीद सादनम्।।

ऋग्वेदातील दुस-या मंडलातील
तेविसाव्या सुक्तामध्ये
केलेले हे वर्णन सांगते की तो
गणांचा गणपती आहे.
ब्रह्मणस्पति आहे, गणांचे नेतृत्व
करुन त्यांना मार्ग दाखविणारा आहे.
कवींचा कवी, द्रष्टांचा महाद्रष्टा आहे.
ज्यांना आत्मज्ञान मिळालेले
आहे त्यांचा तो मूळस्त्रोत आहे.
श्रुण्वन्नुतिभिः सीद सादनम्
अशी साद त्याला महर्षी घालतात
आणि म्हणतात हे गजानना
धावुन ये, तुझ्या सगळ्या वैभवानिशी,
रिध्दी-सिध्दी-बुध्दि, अष्टसिध्दीं सह
या आसनावर विराजमान हो.

देवा दिली हाक उध्दार कराया
आभाळाची छाया तुझी समिंदराची माया

असा हा भक्ताच्या
हाकेला धावुन जाणारा चराचरात दिसणारा,
नावाच्या व रुपाच्या वैविध्यतेने साकारलेला,
जगद्व्यापी बुध्दिदाता,
सर्व कलांचे प्रेरणास्थान,
आबाल वृध्दांना लळा लावणारा,
सगुण साकार, सुखकर्ता, प्रथमेश!
आदिगणेश , मध्यगणेश आणि अंतीही गणेशच.

१. जास्वंदी
२. पांढरे कमळ
३. मधुमालिनी
४. जाई
५. सोनचाफ़ा
६. केवडा
७. बकुळ
८. सुपारी
९. उंडी
१०. नागकेशर
११. मोगरा
१२. धोतरा
१३. कण्हेरी
१४. प्राजक्त
१५. चवई
१६. नांदुरकी
१७. गोविंद
१८. मोहोर
१९. शतपत्र
२०. तांबडे कमळ
२१. नानाविध

# फुले २१
गणपतीला प्रिय

# ८

## अष्ट गंध ( ८ द्रव्यांनी बनलेले गंध)

१.गोरोचन
२.चंदन
३.देवदार
४.कापूर
५.कृष्णागर
६.नागरमोथा
७.कस्तुरी
८.कुंकू

# पाने

१. दुर्वा
२. माका
३. शमी
४. तुळस
५. केवडा
६. मधुमालिनी
७. बोर
८. आघाडा
९. बेल
१०. धोतरा
११. एोलरी
१२. डोलरी
१२. कण्हेर
१३. अर्जुन
१४. रुई
१५. जाई
१६. विष्णुकांत
१७. डाळिंब
१८. देवदार
१९. मोरहा
२०. पपळ
२१. अगस्ति

## गणपतीची साडे तीन पीठे

१. मयुरेश्वर - मोरगाव
२. महागणपती जालना - राजूर
३. मंगलमुर्ती चिंचवड
४. १/२ पीठ पदमालय जळगाव येथील प्रवाळ गणपती

ह्या सगळ्या वस्तू आणि पदार्थ आपल्याला आपल्या संस्कृतीच्या, पावित्र्याच्या आणि निसर्गाच्या जास्तीत जास्त जवळ नेणा-या आहेत



## गणपतीची प्रिय सूक्ते

गणपति अथर्वशीर्ष

ब्रह्मणस्पति सूक्त

गणेशाचे मंत्र

एकाक्षरी: 'ॐ' आणि 'गं'

षडाक्षरी: गणेशाय नमः।

गणपतीचे वर्णन करताना
संत ज्ञानेश्वर म्हणतात,

अकार चरणयुगुल । उ कार उदर विशाल।
मकार महमंडळ । मस्तकाकारे ।
हे तिन्ही एकवटले । तेथे शब्दब्रम्ह कवळिले।
ते मिया गुरुकृपा नमिले । आदिबिज ।

## सांकेतिक अर्थ

योगशास्त्रामध्ये पंचमहाभुतांची प्रतिके
सांगितलेली आहेत.
ही प्रतिके एकावर एक ठेवली तर गणपतीची मूर्ती तयार होते.
फ़क्त त्या मुर्तीला चतुर्दिशा दर्शक चार हात
जोडले की झाले. गणेशाची सोंड सुषुम्ना आहे.
आपल्या सहज श्वासाने ॐ काराचे उच्चारण करावे.
सोंडेने कुंडलिनीचे औटवळण घेउन मस्तकापर्यंत
जाणेही यात दर्शविले आहे.
गणपती योगशास्त्रानुसार
कुंडलिनी जागृतीनंतरची ज्ञानमूर्ती आहे. म्हणुनच तिचे वर्णन
“सूर्यकोटिसमप्रभ” असे केलेले आहे.
उजव्या सोंडेचा गणपती डोळयासमोर आणल्यास
'ॐ गं गणपतेय नमः' या मंत्रातील गंकार
सोंडेने सुस्पष्ट दिसतो. सोंड व कपाळावरचे
बिंदुरुप गंध व भुजा मिळून गं दिसतो. पंचमहाभुते जड
असली तरी त्यातून कुंडलिनी वावरते आहे, हे सोंडेने दर्शविले आहे.
गणेशाची मूर्ती नसेल तर 'गं' हे गणेशाचे बीजाक्षर आहे.
यात साक्षात गणेशत्व वास करते असे मानले जाते.



# अष्टविनायक

| देवतेचे नाव | प्रतिष्ठापना करणारे | ठिकाण |
|---|---|---|
| मोरेश्वर | स्वयंभू | मोरगाव (पुणे) |
| चिंतामणी | ब्रह्मदेव | थेऊर (पुणे) |
| गिरीजात्मज | पार्वती | लेण्याद्री (पुणे) |
| विघ्नेश्वर | पार्श्वमहर्षी | ओझर (पुणे) |
| महागणपती | शिवशंकर | रांजणगाव (पुणे) |
| गजमुख | श्री विष्णू | सिद्धटेक (अहमदनगर) |
| बल्लाळेश्वर | भक्त बल्लाळ | पाली (रायगड) |
| वरदविनायक | गृत्समद ऋषी | महड (रायगड) |

# मोरया गोसावी

गाणपत्य संप्रदायाचा थोर सत्पुरुष.

वडील वामनभट्ट माता पार्वती. मुळचे उपनाव शाळीग्राम.

अनेक सिद्ध पुरुष या घराण्यात जन्मल्यामुळे 'देव'

या नावाने ओळखले जातात. मयुरेश्वराच्या वरदप्रसादाने उतारवयात

वामनभट्टांना व पार्वतीमातेला पुत्ररत्न झाले. मुलाचे नाव मोरया ठेवले.

मोरयाने बालपणीच वेदाध्यायन पूर्ण करून

सिद्धपुरुष योगीराजांच्या सांगण्यावरून 'थेऊर' येथे कडक तपश्चर्या केली

सतत ४२ दिवसांच्या अखंड नामस्मरणानंतर

गणपतीने मोरयाला दृष्टांत दिला.

त्यानंतरही गणपतीचे अखंड स्मरण तनाने व मनाने चालूच राहीले.

आई-वडिलांच्या निधनानंतर त्यांनी मोरगाव सोडले

व ते चिंचवड येथे आले.


# मोरया गोसावी

गोविंदराव कुलकर्णी यांच्या उमा या मुलीशी त्यांचा विवाह झाला.
पुत्रप्राप्ती झाल्यावर त्यांचे नाव चिंतामणी असे ठेवले.
दर चतुर्थीला मोरगावच्या गणपती दर्शनाला मोरया गोसावी जात असत
एकदा स्वप्नात मंगलमुर्तीने सांगितले की एवढ्या दूर येण्यापेक्षा
क-हा नदीत मी आहे. मला बाहेर काढ व घरी घेऊन जा.
मोरया गोसावींनी तसेच केले.
त्यांनी गणपतीवर अनेक प्रासादिक पदे रचली,
जी वेगवेगळ्या गणपती क्षेत्रांमध्ये आजही गायली जातात.
वयाच्या ८६ व्या वर्षी मार्गशीर्ष वद्य षष्ठी शके १३८३ या दिवशी
चिचंवड येथे मोरया गोसावींनी जीव समाधी घेतली

# महाराष्ट्रातील गड़-किल्ल्यातील गणपती



कोंढाणा (सिंहगड)




अलिबाग किल्ला

१ अलिबाग किल्ला - राघोजी आंग्रे यांनी बांधलेल्या या किल्ल्यातील प्रवेशद्वारावर असलेल्या कमानीवर गणपती, रिद्धी, सिद्धी, तसेच गरूड, मकरध्वज, मारूती अशा मूर्ती कोरलेल्या आहेत. याच किल्ल्यात संगमरवरी उजव्या सोंडेची गणेशमूर्ती व गणेश पंचायतन आहे.

२ हरिश्चंद्रगड - येथील चंद्रेश्वर लेण्यात सत्तर ऐंशी मीटर उंचीवर गणेश लेणी आहेत.
तेथे गडाशेजारी शेंदूर चर्चित गणेश मूर्ती आहे.

३ चावंड - प्रसन्नगड येथे सातवाहनकालीन प्रवेशद्वारावर गणपती आहे.

४ कोंढाणा (सिंहगड) येथे एके गणेशटाक आहे .
येथे आत पायया उतरल्यावर सुमारे ४५ सेंमी उंचीचा शेंदूर चर्चित गणेश आहे.



देवगिरी




५ परंडा  परिंदा  परहांडा असे नांव असलेला किल्ला आहे या किल्ल्यात सहा हातांची गणपतीची सुंदर मूर्ती आहे.

६ देवगिरी - किल्ल्याच्या मधल्या डोंगरी किल्ल्याच्या बाजूला बारादरीच्या खाली माधवराव पेशवे यांनी बांधलेले गणेशमंदिर आहे.

७ रायगड - गजशाला व त्याच्या आसपासच्या भागात काही पुरातन अवशेष सापडले होते। त्यात एक गणेश मूर्ती सापडली होती. गंगासागर तलावात देखील एक गणेशमूर्ती सापाडली होती.

८ राजगड - शिवाजी महाराजांची पहिली राजधानी राजगड येथील सुवेळामाची येथे गणपती तटात एक गणेशमूर्ती होती.

९ खांदेरी  या किल्ल्यात २५ सेंमी उंचीची गणेश मूर्ती आहे.

१० जेजूरी  गडावर श्री साक्षीविनायक मंदीर प्रसिद्ध आहे.

११ पद्मावतीच्या मंदिरात ईच्छाश्री गणेशमूर्ती नवसाला पावते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

१२ यशवंतगड - किल्ल्यावर जांभ्या पाषाणाची द्विभूज मूर्ती आहे.

ग्रीक पुराणात 'जॅनस' नांवाची एक
बुद्धीदेवता मानलेली आहे. ती गजमुखी असून
दोन तोंडांची आहे. कोणत्याही मंगलकार्याच्या
प्रारंभी तिची पूजा केली जाते

'जानेवारी' हा वर्षारंभाचा महिना
तिच्याच नावाने सुरू करण्यात आला आहे.
या जॅनेस देवतेचे गणेश देवतेशी बरेच
साम्य दिसून येण्यासारखे आहे.





गणेश पृथ्वी तत्त्वाचा आहे.
म्हणून मातीची मूर्ती. पाणी
हा पृथ्वी आणि आकाश
यांमधला सेतू आहे. म्हणून मूर्तींचं
विसर्जन पाण्यात झाल्यावर
तो पुन्हा स्वर्लोकी जातो
अशी कल्पना आहे.

गणेशोत्सवाच्या निमीत्ताने सर्वत्र गणेशाचे आगमन होते हा उत्साह इतका उत्स्फुर्त असतो की साहजीकच गणपतीबद्दल पावित्र्य व आदरासोबत आपलेपणाची निरागस भावनाही प्रत्येकाच्या मनात दाटलेली असते. दीड, पाच, सात, दहा किंवा अकरा दिवस यथाशक्ती सर्वजण या उत्सवात सहभागी होतात आणि पुढच्यावर्षी लवकर येण्याची विनंती करून भावपूर्ण हळव्या मनाने बाप्पाचे विसर्जन करतात.

# अन्याय माझे कोट्यानुकोटी

हा गणेशोत्सव त्याच भावनेने व निष्ठेने परंतु पर्यावरणास हानी न पोहचवता साजरा करणं ही आजच्या काळाची गरज आहे.



यासाठी घराघरात व सार्वजनिक ठिकाणी
शाडूच्या मातीपासून बनलेल्या
आणि नैसर्गिक रंगात रंगवलेल्या
मुर्तींचा वापर केला जावा.
ज्यामुळे गणेश विसर्जनाने जलप्रदुषण कमी होण्यास
मदत होईल तसेच सागर संपत्तीची
हानी टळू शकेल.विशेषतः सार्वजनिक मंडळांनी
मूर्तीच्या उंचीवर स्वतःहून बंधनं घालून घ्यायला हवीत
ध्वनीक्षेपक अथवा कर्कश्य आवाजाची वाद्ये टाळावीत.
भुमीप्रदूषण टाळण्याकरिता सजावटीसाठी
वापरल्या जाणा-या प्लास्टीक,
थर्माकॉल आदि तत्सम वस्तुंचा वापर टाळावा.
उत्सवाअखेरीस जमणा-या निधीतला काही भाग
समाजउपयोगी कार्यासाठी वापरण्यात यावा.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या
सजावटींमधून संस्कृती दर्शनासोबतच
सामाजिक शिक्षणाला ही प्राधान्य हवे.
राष्ट्रभक्तीपायी, लोकांच्या एकत्रिकरण्याच्या
जाणिवेतून टिळकांनी मनामनात
पेरलेल्या अंकुराला
केवळ करमणुकीचे रुप देऊन आपण
लाजवतो आहोत त्या देशभक्तीला
आणि स्वतःला सुद्धा.

# अन्याय माझे कोट्यानुकोटी

“ अन्याय माझे कोट्यानुकोटी ।
मोरेश्वरा बा तु घाल पोटी । ”

असे म्हणून आपली श्रद्धा
ही पर्यावरण हानिकारक गोष्टींमधून प्रकट करण्यात कितपत तथ्य आहे ?
आणि ह्या सगळयामधून येणा-या पिढीपुढे आपण कोणता आदर्श ठेऊ इच्छितो?
ह्याचा प्रत्येकाने विचार करायला हवा आणि नुसता विचार न करता दरवर्षी
सातत्याने गणेशोत्सवात; त्याच्या सादरीकरणात
समाज व पर्यावरण उपयोगी बदल घडवून आणायला हवेत.

स्वामी विज्ञानानंद (लोणावळा) यांनी वनस्पतीचा
गणपती करण्याची आधुनिक संकल्पना मांडली. त्यानुसार गणेशोत्सवाच्या
निमीत्ताने गणपतीच्या निर्गुण अशा शुन्याकाराला सगुण करायचे.
निर्जीव मुर्तीच्या एकजीव गणेश आकाराप्रमाणे वनस्पती बीजे माती मध्ये पेरायची.
उत्सवाच्या सुरुवातीला लोकांनी एकत्र येऊन गणेश-गुणांची आठवण करुन
एकीचे, प्रगतीचे शुभसंकल्प उच्चारायचे त्या सद्विचारांचे संस्कार वनस्पती बीजांवर होतात.
उत्सवाच्या निमीत्ताने संकल्प पुरक असे कार्यक्रम सर्वांनी उत्साहाने एकत्र
येऊन करायचे. विसर्जनाच्या वेळी उमललेले बीजांकूर प्रार्थनापुर्वक
काढून घ्यायचे.
उत्सव संपलातरी गणपती व
शुभसंकल्पाची आठवण
आपल्यात सदैव
जीवंत रहावी अशा
संकल्पाचे बीजांकूर प्रसाद
म्हणून ग्रहण करायचे.
गणेश आपल्यात रुजवायचा, जीवंत ठेवायचा.
बीजांकूर काढून घेतल्यावर उरलेली संस्कारीत माती
घरातील वनस्पतींच्या कुंड्यांमध्ये अथवा शेतात टाकायची.



# वनस्पतीचा गणपती



## सौ. वैशाली दिवाकर कुलकर्णी

या एक प्रथितयश लेखिका असून
त्यांची "सभा कार्यक्रमांचे आयोजन कसे करावे"
तसेच "मनाचे सामर्थ्य कसे वाढवाल"
आदी विषयांवरील स्वलिखीत पुस्तके आहेत.
सन्मित्र, गर्जना तसेच योगतरंग आदींमधून त्यांचे
विविध विषयांवरील व्यासंगपूर्ण लेख प्रसिद्ध झालेले आहेत.
खगोल शास्त्रापासून ते आहारशास्त्रा तील औषधी तत्वांपर्यंतचे सर्व विषय त्यांनी लीलया हाताळले आहेत
वैदिक ऋषी मुनीं तसेच मराठी संतांवरचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. ज्ञानेश्वरी, आयुर्वेद, भगवदगीता, भागवत
हे तर त्यांचे संशोधनात्मक अभ्यासाचे विषय. वर्तमानपत्र व मासिकांतून त्यांच्या अनेक मुलाखती प्रसिद्ध झाल्या
आहेत. अनेकविध विषयांवर त्यांचे सखोल रीतसर शिक्षण झालेले आहे. वर्तमानपत्रांतून आलेल्या माहीतीची
कात्रणे कापून जपण्यापासून ते संगीत आणि सूत्रसंचालनापर्यंत अनेक छंद त्या जोपासतात.
हे सर्व करीत असतानाच गेली अकरा वर्षे त्या ठाणे जनता सहकारी बंकेच्या संचालकपदीही कार्यभार
संभाळीत होत्या. या पुस्तकातील माहिती हा त्यांच्या अनेक वर्षांच्या तपस्येचा परिपाक आहे.

संपर्क- मोबा - ९००४६७११३५ E-mail - Vaishalidk@yahoo.in

## कु अमृता अनंत ढगे

या एक कलाकार आहेत.
सर जे जे इन्स्टिट्यूट ऑफ़ अप्लाईड आर्ट (मुंबई)
येथून BFA (Applied Arts)
ही पदवी त्यांनी घेतली. सध्या त्या
कंप्युटर ग्राफ़िक्सचे उच्च शिक्षण घेत आहेत.
चित्रकला, कॅलिग्राफ़ी, कविता, वाचन, गाणे,
हे त्यांचे छंद आहेत आणि
गणपतीची पर्यावरणसंगत आरास करणे ही विशेष आवड.
ई साहित्य प्रतिष्ठानच्या अनेक
कार्यांत त्यांचा कलात्मक सहभाग होता.



त्यात ऑडवाटेच्या कविता या पुस्तकाचे मुखपृष्ठ, काव्यांजली, ई सहित्य प्रतिष्ठान, नेटाक्षरी, स्वरनेटाक्षरी, आदींचे लोगो व नाममुद्रा यांचा समावेश आहे. अनेक ई-पुस्तके आणि ई नियतकालिकांचे मुखपृष्ठ व सजावट त्यांनी केलेली आहे.मोरया या पुस्तकाची सजावट व अक्षरमुद्रा त्यांनीच केलेल्या आहेत या पुस्तकात त्यांनी संकलित केलेल्या माहितीचाही समावेश आहे.

संपर्क 0251-2603765 Email: amruta_dhage@yahoo.co.in

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी साहित्याला इंटरनेटच्या युगात आघाडीवर नेण्यासाठी
अनेक संस्था आणि व्यक्ती कार्यरत आहेत.
त्यांच्या या प्रयत्नांत खारीचा वाटा उचलणारे
ई साहित्य प्रतिष्ठान. गेली अनेक वर्षे ओर्कुट,
फ़ेसबुक, ट्विटर आदींवर मराठी साहित्याचे
संवर्धन करीत असतानाच नेटाक्षरी, स्वरनेटाक्षरी,
ई स्टाप, बाल नेटाक्षरी
आदी ई नियतकालिकांच्या निर्मिती आणि
विनामूल्य वितरणाचे काम
ई साहित्य प्रतिष्ठान करीत असते गेल्या वर्षभरात
ई साहित्य प्रतिष्ठानने नऊ ई पुस्तकांची निर्मिती केली आणि
लाखों वाचकांपर्यंत ती ई मेल द्वारे विनामूल्य पोचवली.
नेटाक्षरी या नियतकालिकाचे ७५ अंक गेल्या दोन वर्षांत
वितरित करण्यात आले आहेत.

मोरया हे पुस्तक श्री गणेशाच्या संदर्भातील
दुर्मिळ माहीतीवर आधारित आहे.
सौ. वैशाली कुलकर्णी आणि
कु. अमृता ढगे यांनी संकलित केलेले
आणि सजवलेले हे पुस्तक वाचून केवळ
स्वतःपुरते न ठेवता ते जास्तीत जास्त
तरूणांपर्यंत पोहोचवण्यात आपण
आम्हाला हातभार लावावा ही विनंती.
विशेषतः परदेशस्थ मराठी नवीन पिढीला
श्री गणेशाच्या चहू अंगांची माहिती करून द्यावी.
हे पुस्तक कसे वाटले ते कळवा. तसेच आगामी
पुस्तके विनामूल्य मिळण्यासाठी नांव नोंदवा.

esahity@gmail.com | 9869674820

## ई साहित्य प्रतिष्ठानची यावर्षातील प्रकाशने

टल्लीची शाळा-टल्ली, मकरंदच्या त्रिवेण्या-मकरंद सावंत, ग्रेव्हयार्ड लिटरेचर-प्राजक्त देशमुख, चार क्षण-संतोष नार्वेकर
तो आणि ती-मयुरेश कुलकर्णी, प्रियेचे अभंग- रमेश ठोंबरे, देशी दारूचे दुकान-धुंद रवी,
ई शाळा - इंटरनेट वर मराठी कसे लिहावे-भारती सरमळकर, तो , मी आणि सिगारेट- स्वप्ना कोल्हे